# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०३/२०२४ (शनिवार) सकाळ**


---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दिनांक १५/०३/२०२४ रोजीचे १५.४० ते १६.४० वा. पर्यंत आगामी लोकसभा निवडणूक संबंधाने मा. श्री विपिन इटणकर जिल्हाधिकारी नागपूर व मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक, ते गांधी चौक, आंबेडकर चौक, बस स्टँड चौक, ते पोलीस स्टेशन रामटेक असा रूटमार्च घेण्यात आला असून रूट मार्चमध्ये श्री तुषार ठोंबरे अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर, श्रीमती वंदना सवरगंपते उपविभागीय अधिकारी रामटेक, श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक, श्री दीपक अग्रवाल परी. पो. उपअधीक्षक, श्री. रमेश कोळपे तहसीलदार रामटेक, श्रीमती पल्लवी राऊत मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक, श्री प्रशांत काळे पोलीस निरीक्षक रामटेक हे हजर असून रूटमार्च मध्ये १२ अधिकारी आरपीएफ पथक, आरसीपी पथक, असे एकूण ९० पोलीस अंमलदार, २५ होमगार्ड सैनिक हजर होते.

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार तसेच अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. रमेश धुमाळ तथा उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन नरखेड हद्दीमध्ये आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक तसेच आगामी येणारे सण उत्सव होळी, धुलिवंदन, शिवजयंती उत्सव, रमजान, इत्यादी शांततेत संपन्न होण्याच्या दुष्टिकोनातून पोलीस ठाणे नरखेड हद्दीत पोलिस अधिकारी आणि अंमलदार यांचा रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्चमध्ये RPF प्लाटून RPF पथकातील २२ जवान, पोलीस स्टेशनचे १ अधिकारी व ०७ अंमलदार व १२ होमसैनिक हजर होते. सदर रूटमार्च हा नरखेड, मोवाड, सावरगाव परिसरात घेण्यात आला सदर रूट मार्च हा १३.०० वा पासून १७/५० वा. पर्यंत घेण्यात आला.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर